**माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 4(1)(ब)(13)**

**(गुण नियंत्रण विभाग (कृषि)) पंचायत समिती, तासगांव**

अर्धवेळ गुणनियंत्रण नियंत्रण निरिक्षकांनी करावयाची कार्यवाही बियाणे,खते व किटकनाशके यंाची खरीप हंगामासाठी मे च्या शेवटच्या आठवडयापासून शेतक-याकडून खरेदी होते. बियाणे एप्रिल व मे मध्ये कृषि सेवा केंद्राशी संपर्क साधणे. नमुने काढताना बियाणाचे पिकनिहाय, खतांचे ग्रेडनिहाय किटकनाशकाच्या प्रकारानुसार माहिनानिहाय दिलेल्या लक्षांकानुसारच नमुने काढण्यात यावेत. जेणेकरुन विश्लेषण करणे साईचे जाईल. अप्रमाणित नमुन्याची माहिती प्रयोग शाळाकडून आपणास तारेने/एस.एम.एस.व्दारे उपलब्ध होते. हंगामपूर्व पूर्णवेळ/अर्धवेळ निरिक्षकासाठी प्रशिक्षकासाठी प्रशिक्षण वर्ग विभाग/जिल्हास्तरावर आयोजित करावेत. उत्पादक व विक्रेत्याचे प्रशिक्षण विभाग व जिल्हास्तरावर आयोजित करावे. प्रशिक्षणात दयावयाची इतर माहिती स्वतंत्ररित्या देणेत यावी. विक्रेते वितरक साठवणूक केंद्रे व उत्पादन स्थळाची तपासणी करुन त्रुटीविषयी जागेवरच कार्यवाही करावी किंवा लेखी सूचना देऊन पूर्तता करुन घेणेत यावी.

**गुणवत्ता नियत्रण कक्षाची स्थापना**

1.गुणवत्ता नियंत्रण कामाचे नियंत्रण दैनंदिन सनियंत्रणासाठी प्रत्येक हंगामात आयूक्तालयस्तर, विभागीयस्तर, जिल्हास्तर व तालुका स्तरावर स्थापना करणेत यावी.

2.आयुक्तालय स्तरावर गुणवत्ता नियंत्रण विभागात विभागीय कृषी सहसंचालक यांचे कार्यालयात जिल्हास्तरावर कृषी विकास अधिकारी यांचे कार्यालयात स्थापना करणेत यावी.

3.कक्षासाठीचा दूरध्वनी क्रमांक ई मेल पत्रव्यवहाराचा पत्ता वेळ कालावधी इ.ची माहिती प्रसिध्दीस द्यावी.

4.वरीलप्रमाणे कार्यवाहीबाबत आयुक्तालयास कळवावे.

## गुणनियंत्रण कक्षाची कर्तव्ये

## (गुण नियंत्रण विभाग (कृषि)) पंचायत समिती, तासगांव

१) कक्ष स्थापनेबाबत प्रसिध्दी देणे.

२) कक्षात प्राप्त होणा-या व प्रसिध्दी माध्यमांव्दारे येणा-या तक्रारींची नोंद घेणे.व त्याबाबत चौकशी करणे.

३) बियाणाबाबत तक्रारी जिल्हास्तरीय समितीकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे.

४) अप्रमाणित घोषित झालेल्या नमुन्याबाबत पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी तपासणी पथकास कळविणे.

५) पथकाच्या कार्यवाहीचा अहवाल वरीष्ठ कार्यालयास सादर करणे.

## तपासणी पथकाची स्थापना

१) आयुक्तालय स्तर 2) विभाग स्तर 3) जिल्हास्तर 4) उपविभाग स्तर

## जिल्हास्तर

१) जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी/कृषी विकास अधिकारी/मोहिम अधिकारी/जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक/जिल्हा कृषी अधिकारी

२) संबंधित तालुका कृषी अधिकारी/कृषी अधिकारी पंचायत समिती पथक सदस्य/ वजनमापे निरीक्षक/ कृषि अधिकारी/ तालुका कृषि अधिकारी.

## उपविभाग स्तर

१) उपविभागीय कृषी अधिकारी /तंत्र अधिकारी (विस्तार) -पथक प्रमुख

२) संबंधित तालुका कृषी अधिकारी/कृषी अधिकारी पंचायत समिती पथक प्रमुख.

सदर पथकात आवश्यकतेनुरूप वैधमापन शास्त्र विभागाचे व पोलीस निरीक्षक यांचा समावेश करावा

**किटकनाशक व बियाणे नवीन परवाना व नुतनीकरण करणे हा विषय राज्य शासन कृषीविभाग यांचेकडे आहे.**

## बियाणे विक्री स्तरावर दर्शविण्याच्या बाबी.

१) बियाणे विक्री व साठवणूक परवाना दर्शनीभागी लावावा

२) बियाणे साठा फलक व भावफलक ग्राहकाला सहज दिसले असा लावावा

३) विक्री करता ठेवणेत आलेल्या सर्व बियाणांची खरेदी बीले जतन करून ठेवावीत.

४) साठा व विक्री नोंदवही ठेवावी

५) बियाणांची स्त्रोत नोंदवही ठेवावी.

६) खरेदी बीले देण्यासाठी पावती पुस्तक ठेवावे

७) बिलांमध्ये बियाणंांंचा संपूर्ण तपशील द्यावा.

८) मुदतबाह्या बियाणे साठा नोदवही ठेवावी

९) मागील तीन वर्षाच्या बियाणे खरेदी/विक्री बाबत संपूर्ण अभिलेख जतन करावा

**रासायनिक खते विक्री स्तरावर दर्शविण्याच्या बाबी**

१) विक्री परवाना दर्शनी भागात लावावा

२) अद्यावत साठाव भाव फलक दर्शनी लावावा

३) खरेदीदारास फॉर्म एम मध्ये स्वाक्षरी घेवून बील देणे.

४) साठा रजि.दररोज पूर्ण करणे

५) रासायनिक खताचा मासिक अहवाल परवाना अधिकारी व कृषी विकास अधि.जि प . यांना विहित मुदतीत पाठविणे

६) सर्व रासायनिक खताचे उगम प्रमाणपत्र परवाना अधिकारी यांचेकडून परवान्यात समावेश नोंद करून जतन करावे.

**(गुण नियंत्रण विभाग (कृषि)) पंचायत समिती, तासगांव**

**विक्रेता स्तर तपासणी**

१. विक्रेत्याकडील परवाना योग्य त्या ठिकाणी लावला आहे किंवा नाही . परवान्यात विक्री करण्यात येत असलेल्या सर्व निविष्टांचा समावेश आहे किंवा नाही.

२. खरेदी विक्रीची पावती व्यवस्थित देणेत येते किंवा नाही हे तपासावे.

३. कायदयानुसार विविध अभिलेख अदयावत भरलेले आहेत का व त्याच्या नोंदवहया निरिक्षकांकडून प्रमाणित केल्या आहेत का.1

४. संशयीत तक्रार संबंधिताच्या निविष्ठांचे नमुने काढणे व त्यांचे मुळ स्त्रोतापर्यंत अभिलेख मिळविणे,साठा जप्तीबाबत कार्यवाही.

५. अदयावत भाव फलक व साठा फलक लावला आहे का.1

६. कृत्रिम टंचाई प्रकरणी समक्ष विक्री करणे.

७. अप्रमाणीत घोषीत झालेल्या नमुन्याचे प्रकरणे बेकायदेशीर साठा प्रकरणी विक्री बंद करून साठा जप्ती व पुढील कायदेशीर बाबी.

८. निविष्ठा विक्री करताना जबरदस्तीनें विक्री लिकींग होत नसलेचे खात्री करणे

९. मुदत बाहय साठयाचे बिलगीकरण करून त्याचा सुचना फलक लावल्याची खात्री करणे.

१०. अवैदय /नकली /बनावट साठा व विक्री प्रकरणे जरूरी नुसार पोलिसांचे साहय घेऊन कायदेशीर कारवाई करणे.